




दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**





● वर्ष : ०१ ● अंक : ३५१ ● पुणे ● गुरुवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




आबा बागुल यांच्या प्रचार रॅलीला उस्फुर्त प्रतिसाद

3



पंचवीस वर्षे पवारांसोबत; यापुढेही काम करत राहील

4

## ठळक बातम्या

### आयुक्तालयाजवळ सापडले बॉम्बशेल

**पिंपरी : (आरंभ पर्व)** पिंपरी पोलीस आयुक्तालयाजवळ जलवाहिनी दुरुस्तीसाठी खोदकाम सुरू असताना तीन बॉम्बशेल आढळून आले. पिंपरी – चिंचवड आणि पुणे पोलीस आयुक्तालयाचे बॉम्ब शोधक-नाशक पथकाने बॉम्बशेलची तपासणी केली असता हे बॉम्बशेल निकामी असल्याचे स्पष्ट झाले. बुधवारी (30 ऑक्टोबर) दुपारी साडेबाराच्या सुमारास चिंचवड – प्रेमलोक पार्क येथील नाल्याजवळ हा प्रकार उघडकीस आला. चिंचवड येथे पोलीस आयुक्तालयाजवळ असणाऱ्या प्रेमलोक पार्क येथील नाल्याजवळ महापालिकेकडून जलवाहिनी दुरुस्तीचे काम सुरू होते. खोदकाम सुरू असताना दुपारी साडेबाराच्या सुमारास बॉम्बसदृश्य तीन वस्तू सापडल्या.

### ‘नशा’ उतरणार का?

**पुणे : (आरंभ पर्व)** शहरातील वाढते अपघात, रात्री अपरात्री मद्य पिऊन भरधाव वेगाने वाहने चालविण्यामुळे होणारे गंभीर अपघात, तसेच बेशिस्त वाहनचालकांना शिस्त लावण्यासाठी आता पोलिसांकडून दररोज मध्यरात्री शहरातील प्रमुख चौक, रस्त्यांवर नाकाबंदी करून वाहनचालकांची तपासणी सुरू करण्यात आली आहे. नाकाबंदी करून वाहनचालकांच्या बेशिस्तीला वेसण घालण्याचा प्रयत्न, मोहीम चांगली आहे. वाहनचालकांनी किमान वाहन चालविताना नियमांचे पालन केल्यास शहरातील वाहतुकीचे प्रश्न बऱ्यापैकी सुटतील आणि गंभीर अपघातांचे प्रकारही कमी होतील. पोलिसांनी कारवाईत सातत्य ठेवले तर, वेगाची ‘नशा’ उतरण्यास वेळ लागणार नाही...

# संपादीका सौ. सुरेखा मते यांना पुरस्कार जाहीर

## सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्काराने आज अनेकांचा होणार गौरव

- राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, भोसरीचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार : डॉ. रवींद्र भोळे



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारत सरकारच्या नीती आयोगाशी संलग्नीत असणाऱ्या डॉ. मणिभाई मानवसेवा ट्रस्टच्या वतीने सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्ताने, राष्ट्रीय एकात्मता दिन व सरदार पटेल यांच्या जीवानावर आधारित राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मेळाव्यामध्ये निरपेक्षपाने निरंतर राष्ट्रसेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांना 'सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असून हा मेळावा सावित्रीबाई फुले सभागृह, लोहिया नगर पुणे येथे 31 ऑक्टोबर रोजी सायं 6 वाजता घेण्यात येणार असल्याचे डॉ. मणिभाई मानवसेवा ट्रस्टचे अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक प्रवचनकार हभप डॉ. रवींद्र भोळे यांनी सांगितले आहे. यावर्षीचा पुरस्कार डॉ. शामाप्रसाद मुखर्जी राष्ट्रीय विचार मंचाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुशील कुमार सरवागी, मंचाचे केंद्रीय महामंत्री राहुल कुमार गोयल यांना जाहीर करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाला केंद्रीय विमान वाहतुक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, भोसरीचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे भोळे यांनी पत्रकातून स्पष्ट केले आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांना भारताचे लोहपुरुष म्हणून ओळखतात. त्यांनी घालून दिलेल्या आदर्शांवर अनेक कार्यकर्ते कार्यरत असून देशाला मजबूत बनविण्यासाठी ते आपल्यापरीने योगदान देत असतात. या कार्यात अनेकदा ते तन, मन, धन लावून देशाची सेवा करतात. त्यामुळे अशा कार्यकर्त्यांना आम्ही आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, हे दाखविण्यासाठी आम्ही या पुरस्कारांचे वितरण करतो, असे डॉ. मणिभाई मानवसेवा ट्रस्टचे अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक प्रवचनकार हभप डॉ. रवींद्र भोळे यांनी पुरस्कार जाहीर करताना सांगितले.

वैद्यकीय क्षेत्र : डॉ. सुनील वासुदेव पाटील, गिरिजा शंकर शुक्ला, डॉ. राजेश नारायण घाटकर, डॉ. कीर्ती ऋषिकेश कुलकर्णी

पत्रकारिता : प्रतिक गंगणे (पत्रकार, संपादक), प्रल्हाद गोपाळ खर्चे (पत्रकार, ज्योतिष), श्री राजेखान पटेल (पत्रकार), सतीश सांबसकर (पत्रकार), कादंबरी वसंतराव नलावडे, सुरेखा सावंत-मते (संपादिका)

सामाजिक क्षेत्र : सिताराम गणपत राणे, विकास लीलाधर वारके, हेमंत श्रीरंग झोपे, उमेश श्रीरंग फिरके, अँड शितल पाटील, अनिल नामदेव डाहेलकर, दिनकर बळीराम चौधरी, श्रीमती रेखा विनायक आखाडे, सुविधा सुनील नाईक, संदीप कचरू ढेरंगे, विलास मारुती कर्डिले, सोपानराव विलासराव ढोरकुले, राहुल कुंडलिक शिरूरे, भागवत अशोक गोलांडे, सुनील शेठ दाभाडे, अनिल गोविंद भिलारे, बाळासाहेब तुकाराम बानखेले, दिलीप गुलाब हांडे, सीमा सचिन चव्हाण, अंजू कोंडीराम सोनवणे, शशिकांत मनोहर कवडे पाटील.

आध्यात्मिक क्षेत्र : अमोल विष्णू पाटील, हभप मधुकर दिनकर जाधव, हभप दिलीप शंकर पाटील, ऋषिकेश श्रीकृष्ण भाले, हभप लक्ष्मण महाराज गोलांडे, अरुणराव दिगंबरराव देऊळगावकर, विजय दामोदरराव ढोरे, विठ्ठल नारायण शिंदे, सुनील जगताप, प्रकाश मारोती मुंडे, किशोर जगन्नाथ लडकत, हभप पुरुषोत्तम महाराज हिंगणकर

शैक्षणिक क्षेत्र : चेतन सोनवणे, सुनंदा किरण डेरे, रमेश लक्ष्मण गायकवाड, हरिश्चंद्र शंकरराव गायगोले, सुनील मनोहर पाटील, अंकुश दामोदर भरत , एनुद्दीन अकबर काझी, सौ मनीषा नितीन पाटील, बापूसाहेब महादू शिंदे, डॉ शितल भागवत जाधव

आरोग्य सेवा : सुनील गोविंदा ढाके

सर्पमित्र : संतोष बाबुराव नातू, खलील महबूद शेख

कृषी : मधुकर गंगाधर भागवत, सुभाष केशव खोसे

दिव्यांग क्षेत्र : श्रीमती छाया जयवंत सरवद, रवींद्र शिवाजी जोशी, राजाराम मारुती जगताप, संतोष दिगंबर चिंचोळकर

क्रिडा : अशोक रामचंद्र नांगरे

कला : सुभाष जीवा राठोड

पोलीस सेवा : संजय देवराम सांगळे, हरीश लक्ष्मण अवचर, विजय वासुदेव खर्चे (सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त )

तांत्रिक क्षेत्र : सम्राट विजय भालेराव, बाळकृष्ण भिमराव लोखंडे, सिद्धार्थ लाला साळवे

आदर्श शेतकरी : नितीन न्यानोबा कुंजीर, बाळासाहेब सोनबा बनकर

# प्रतिक गंगणे यांना ‘हिंदू रत्न’ पुरस्कार जाहीर

- केंद्रीय विमान वाहतुक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व भोसरीचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्या उपस्थितीत पार पडणार पुरस्कार सोहळा





**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे येथील पत्रकार प्रतिक गंगणे यांना 'सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न' पुरस्कार जाहीर झाला असून हा पुरस्कार सावित्रीबाई फुले सभागृह, लोहिया नगर पुणे येथे आज 31 ऑक्टोबर रोजी सायं 6 वाजता देण्यात येणार असल्याचे डॉ. मणिभाई मानवसेवा ट्रस्टचे अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक प्रवचनकार हभप डॉ. रवींद्र भोळे यांनी सांगितले आहे.

यावर्षीचा पुरस्कार डॉ. शामाप्रसाद मुखर्जी राष्ट्रीय विचार मंचाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुशील कुमार सरवागी, मंचाचे केंद्रीय महामंत्री राहुल कुमार गोयल यांना जाहीर करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय विमान वाहतुक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, भोसरीचे विद्यमान आमदार महेश लांडगे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे भोळे यांनी पत्रकातून स्पष्ट केले आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांना भारताचे लोहपुरुष म्हणून ओळखतात. त्यांनी घालून दिलेल्या आदर्शांवर अनेक कार्यकर्ते कार्यरत असून देशाला मजबूत बनविण्यासाठी ते आपल्यापरीने योगदान देत असतात. या कार्यात अनेकदा ते तन, मन, धन लावून देशाची सेवा करतात. त्यामुळे अशा कार्यकर्त्यांना आम्ही आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत, हे दाखविण्यासाठी आम्ही या पुरस्कारांचे वितरण करतो, असे डॉ. मणिभाई मानवसेवा ट्रस्टचे अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक प्रवचनकार हभप डॉ. रवींद्र भोळे यांनी पुरस्कार जाहीर करताना सांगितले.






# पुणेकर बंडखोरांना ‘योग्य जागा’ दाखवितात!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मतदार आपल्याच पाठीशी असल्याचे प्रत्येक उमेदवार ठामपणे सांगत असतो. पक्षाने डावलले तर उद्विग्न होऊन ‘आता नाही तर कधीच नाही’ असा विचार करून मतदारांच्या भावनेला साद घालतो आणि पक्षाच्या विरोधात अपक्ष किंवा कोणत्या तरी नावाची आघाडी स्थापन करून निवडणुकीला सामोरे जातो. अशा उमेदवारांच्या भावनिक आवाहनाचा पुणेकरांवर कधीच परिणाम झालेला दिसत नाही. त्यामुळे अशा बंडखोरांना पक्षनिष्ठा किती महत्त्वाची आहे, हे पुणेकर कायम दाखवित आले आहेत. त्यामुळे आजवरच्या लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीत बंडखोरांना यश मिळाले नसून, बंडखोरांना ‘योग्य जागा’ दाखविण्याचे काम पुणेकर करत आले आहेत.



निवडणूक लोकसभेची असो, की महापालिकेची, पुणेकर कायम पक्षनिष्ठा दाखविणाऱ्या उमेदवाराला साथ देत आले आहेत. पुणे लोकसभा मतदारसंघात 1998 च्या निवडणुकीत बंडखोरीचा प्रयत्न झाला होता. त्या वेळी पुण्यावर प्राबल्य असलेले माजी खासदार सुरेश कलमाडी यांनी काँग्रेस सोडून ‘पुणे विकास आघाडी’ स्थापन केली होती. त्या वेळी काँग्रेस पक्षामध्ये केंद्रीय पातळीवर घडामोडी घडत होत्या. सोनिया गांधी यांनी पक्षात प्रवेश केला होता. सीताराम केसरी हे त्या वेळी काँग्रेसचे नेतृत्व करत होते. केसरी यांनी पक्षांतर्गत विरोधकांना उमेदवारी न देण्याचे ठरविले होते. कलमाडी यांनाही काँग्रेसकडून उमेदवारी मिळण्याची शक्यता नव्हती. 1984 मध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यामुळे कलमाडी यांना राज्यसभेवर खासदारकीची संधी मिळाली होती. मात्र, नंतरच्या काळात ते पवार यांच्या विरोधात गेले होते.

त्यामुळे 1998 च्या निवडणुकीत कलमाडी यांना काँग्रेसकडून उमेदवारी मिळण्याची सुतराम शक्यता नव्हती. त्यामुळे त्यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन ‘पुणे विकास आघाडी’ स्थापन केली. त्यांच्याबरोबर त्या वेळी पुण्यातील 50 नगरसेवकांनीही काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला होता. त्यावरून कलमाडी यांची पुण्यावरील पकड स्पष्ट झाली होती. त्या निवडणुकीत काँग्रेसने दिवंगत खासदार विठ्ठल तुपे यांना उमेदवारी दिली होती. भाजपने त्या वेळी उमेदवार देण्याऐवजी कलमाडी यांना पाठिंबा दिला होता. त्यामुळे भाजपकडून इच्छुक असलेले माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी हे नाराज झाले होते. ते अपक्ष उमेदवार होते. कलमाडी यांच्यासाठी दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी पुण्यात जाहीर सभा घेतली होती. त्या सभेत कलमाडी यांना साथ देण्याचे आवाहन करण्यात आले. मात्र, तरीही कलमाडी यांचा पराभव झाला आणि विठ्ठल तुपे निवडून आले. तसेच धर्माधिकारी यांनाही पुणेकरांनी नाकारले होते. ते तिसऱ्या स्थानावर राहिले.

शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघाचे विभाजन होऊन कोथरूड हा नवीन मतदारसंघ झाल्याने 2009 च्या पहिल्याच निवडणुकीत चुरस होती. त्यावेळी भाजपचे माजी नगरसेवक उज्ज्वल केसकर आणि माजी नगरसेवक दीपक मानकर यांनी अपक्ष निवडणूक लढविली होती. मानकर हे 22 हजार 853 मते मिळवून तिसऱ्या स्थानी, तर केसकर हे दहा हजार मते घेऊन पाचव्या स्थानी राहिले. त्या वेळी शिवसेनेचे चंद्रकांत मोकाटे हे निवडून आले होते.

लोकसभेशिवाय विधानसभा निवडणुकीतही काही ठिकाणी बंडखोरी झालेली दिसते. कसबा पेठ विधानसभा मतदारसंघात 2019 च्या निवडणुकीत शिवसेनेचे माजी नगरसेवक विशाल धनवडे हे उमेदवारीसाठी आग्रही होते. त्यांना उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी अपक्ष निवडणूक लढविली. त्यांना 13 हजार 989 मते मिळाली. मात्र, ते तिसऱ्या स्थानी राहिले. दिवंगत आमदार मुक्ता टिळक या निवडून आल्या होत्या.

लोकप्रिय असलेल्या अपक्ष उमेदवारांना पुणेकर मते देतात; पण ते विजयी होतील, एवढी मते कधीही मिळत नाहीत. थोडक्यात, पुणेकरांनी बंडखोरांना कायम घरी बसवले असून, पक्षनिष्ठा महत्त्वाची असल्याचे दाखवून दिले आहे. त्यामुळेच पुण्यात नाराज झालेले उमेदवार हे ऐन वेळी सोय म्हणून कोणता तरी पक्ष शोधत असतात. मात्र, त्यांनाही पुणेकर घरचा रस्ता दाखवित असल्याचा इतिहास आहे.




# दिवाळीत दुःखी राहायचं की सुखी तुम्हीच ठरवा...



*दिवाळीत, कोणत्याही सणाला सिग्नलला उभी असलेली एखादी नवीन कोरी गाडी पाहिली की त्यांना पाहून आपण नाराज होतो. पण कुबड्यांचा आधार घेवून त्याच गाडी समोर भीक मागणारा भिकारी पाहून आपण स्वतःला खूप भाग्यवान समजायला हवं. ते आपण करतो का? असे पावलोपावली समाजात खूप विरोधाभास आहेत जे आपल्याला विचार करायला प्रवृत्त करतात. आपल्या अपेक्षा आणि समाधानी वृत्ती यांचा ताळमेळ घालता आला तर आपल्यापेक्षा नशीबवान कोणीच नाही हे लक्षात येईल. त्यामुळे या दिवाळीत स्वतःला जे आहे, जे मिळत आहे त्यात सुखी समाधानी आनंदी समजून आलेलनया लक्ष्मीच स्वागत करा.पुढे जाण्यासाठी प्रामाणिक पणा, मेहनत, सातत्याने प्रयत्न याशिवाय पर्याय नाही. खोटं बोलून, कोणाला फसवून, भ्रष्टाचार करून, चुकीची कामं करून, गैर व्यवहार, गैर वर्तन करून, कोणाशी वाईट वागून पैसा नक्कीच मिळतो पण त्या पैशात आनंद,सुख-समाधान, शांती विकत घेता येत नाही. त्यामुळे आपले काम, आपले घर, कुटुंबातील माणसं यांना सांभाळा म्हणजे दिवाळीचा आनंद द्विगुणित होईल यात शंकाच नाही.*

दरवर्षीप्रमाणे या वर्षी पण आपल्या सर्वांचा आनंदाचा, महत्त्वाचा, उत्साहाचा सण म्हणजे दिवाळी आली आहे. घरोघरी दिवाळीची तयारी, खरेदी, लगबग, फराळ, घराची सजावट, फिरायला जाण्याचे नियोजन सुरू आहे. समाज माध्यमातून अनेक जाहिराती, फोटो, व्हीडिओ, सर्व प्रकारची उत्पादने, कपडे, खाद्य पदार्थांचे फोटो यांचा महापूर वाहतो आहे. कोणी स्वतःचं हक्काचं नवीन घर घेतलं आहे, कोणी मोठी गाडी तर कोणी दुकान घेतलं आहे. कोणी नवीन ऑफिस सुरू केलं आहे. कोणी फॅमिलीसोबत भारतात किंवा भारताबाहेर फिरायला जात आहे, कुठे दागदागिने, सोने-चांदीची खरेदी सुरू आहे तर कुठे कोणी घरी नवीन मोबाईल, फ्रीज, टीव्ही यांसारख्या ब्रँडेड इलेक्ट्रॉनिकच्या वस्तू घेतल्या आहेत. कोणी जागा, जमिनी घेतल्यात तर कोणी स्वतःचे उत्तुंग बंगले बांधून त्यात गृहप्रवेश करत आहेत. प्रत्येक रस्त्यावर, दुकानात, मॉलमध्ये खरेदीसाठी गर्दी ओसंडून वाहते आहे. ऑनलाईन बाजारात पण मोठी उलाढाल सुरू आहे. हे सगळं आपल्या आजूबाजूला होत असताना अगदी लहान मुलापासून ते म्हाताऱ्या व्यक्तींपर्यंत अनेकांना वाटतं मी नाही घेऊ शकत, मी नाही करू शकत, माझी ऐपत नाही, माझं बजेट नाही. एखादी गृहिणी, पत्नी नवऱ्याने या दिवाळीत तरी आपल्याला छोटासा दागिना करावा म्हणून हट्ट धरून बसली असेल. एखादा मुलगा वडिलांनी आपल्याला नवीन मोबाईल किंवा गाडी घ्यायला हवी म्हणून नाराज असेल. एखादी बहीण भावाने या भाऊबीजेला तरी भारी साडी घ्यावी म्हणून आस लावून असेल, तर कोणाचे म्हातारे आई-वडील मुलगा आपल्याला कपडे करेल दिवाळीत म्हणून अपेक्षा ठेवून असतील. प्रत्येक जीव छोट्यापासून ते वयोवृद्धांपर्यंत आपल्यासाठी कोणी काही करावं यासाठी आसूसलेला असतो. मित्राला वाटतं असेल मैत्रिणींनी छान गिफ्ट द्यावं, गर्ल फ्रेंडला वाटतं असेल या दिवाळीत माझ्या बॉयफ्रेंडने फक्त ग्रीटिंग न देता काहीतरी चांगली वस्तू गिफ्ट करावी. रिलेशनशिपमध्ये असलेले सुद्धा दिवाळीत एकमेकांना कसं खूश करायचं, किती महागडा, वेगळं काहीतरी घेऊन द्यायचे याचे नियोजन करत असतीलच. महिलांना तर सणवार खरेदीचा अमाप उत्साह असतो आणि तो हवा. पण कारण



ती शेवटी गृहलक्ष्मी आहे. घरातील लक्ष्मी समाधानी आणि सुखी असेल तर त्या घरात कशाला कमी पडत नाही ते उगाच म्हणत नाहीत. घरातील, प्रपंचांतील जबाबदाऱ्या पूर्ण करत असताना तिलाही वाटणार मला वैयक्तिक काय मिळालं? दिवस-रात्र कामं करणारी घर आणि बाहेरच्या आघाड्या सांभाळणारी महिला दिवाळीत हक्काने नवऱ्याकडून स्वतःसाठी थोड्या फार खर्चाची काही अपेक्षा ठेवत असेल, तर त्यात चुकीचं काहीच नाही. कोणी करोडो रुपयांत दिवाळी करतं तर कोणी अगदी चार आकडी पगाराच्या बोनसच्या रकमेतून पण करतात. आपली परिस्थिती, आपल्या समोरील अन्य जबाबदाऱ्या, अन्य समस्या, इतर खर्च सर्व लक्षात घेऊन दिवाळीच नियोजन घरोघरी केलं जातं. कशात काही उणीव राहू न देता पण कमीत कमी खर्चात सगळेच सणवार करता येतात आणि ते तसेच करणं अपेक्षित असतं. त्यामुळे खूप दिखावा, बडेजावं केला म्हणजेच सण साजरा झाला असं मुळीच नाही. आजकाल सामाजिक माध्यमातून सतत एकमेकांना पाहताना, विविध ॲप्लिकेशनमधून टाकले जाणारे व्हीडिओ, फोटो, स्टेट्स आपल्याला आपले शेजारी, नातेवाईक, मित्र-मैत्रिणी, ओळखीचे काय काय नवीन घेतले आहे, कोणते कपडे घातले आहे, कुठे फिरायला गेले आहेत हे सर्व माहिती पुरवत असतात. प्रत्येकाच्या आयुष्यात रोज आनंदी आनंद असल्यासारखं लोकं रोज स्वतःच सर्व सोशल मीडियामधून अपडेट करत असतात. हे पाहताना कळत-नकळत आपल्या मनात तुलना सुरू होते आणि आपण स्वतःला कमी लेखू लागतो. अगदी साड्यांच्या दुकानात गेल्यावर पण जेव्हा सेल्समन बजेट विचारतो आणि एका ठरावीक काउंटरला पाठवतो तेव्हा महिलांची एक नजर तरी महागड्या साड्यांच्या काउंटरवर जातेच. आपण त्या काउंटरच्या साड्या कधी घेऊ शकतो? किंवा तिथे खरेदी करणाऱ्या महिला किती भाग्यवान आहेत हा विचार मनात येतो. दिवाळीच्या मुहूर्तावर एक ग्रॅम सोनं घ्यायला आलेलं जोडपं! पण त्यातील महिला इतर काउंटरवरील घसघाशीत दागिने एक चक्कर मारून पाहून येतेच. पुढील दिवाळीत हे नक्की घ्यायचं म्हणून मनात दृढ निश्चय करते. लहान मुलं फटाके घेताना आणि त्यांना समजावताना आई-वडिलांना नाकी- नऊ येतात पण यावेळी जाणवत की जिथे आपण आपल्या भावनांना आवर घालू शकत नाही तिथे या लहानग्यांकडून कशा अपेक्षा करणार. आता हे सर्व पाहत असताना कोणाची प्रगती, उत्तुंग भरारी, मारेमाप पैसा असलेली कुटुंबच समाजात आहेत मग आपण कुठे आहोत? आपण मागे का आहोत? आपलंच नशीब असं का आहे? आपण कुठे कमी पडलो? आपणच कायम मनाला मुरड घातली? यावर विचार करून जे काही आहे त्याचा आनंद पण आपण घेऊ शकत नाही. आपण फक्त आनंद, उत्सव, उत्साह, खर्च हेच पाहून इतकं भारावून जातो की दिवाळीची नाही तर आयुष्याची दुसरी बाजू पाहायला आपण विसरतो. परदेशात सहलीला नेणारा एखादीचा नवरा, दागिने घेऊन देणारा एखादीचा भाऊ, महागड्या साड्या घेऊन देणारे सासरचे सगळ्यांनाच मिळतील असं नाही. आपला नवरा आपल्याला प्रेमाने शेजारच्या गावातील देव दर्शनाला जरी मनोभावे नेत असेल तर त्यात सुख मानता आलं पाहिजे आणि भावाने ताटात अकरा रुपये ओवाळणी टाकली तरी त्याचा मान ठेवता आला पाहिजे इतकं आपल्याला स्वतःला सावरणे जमलं तर आयुष्य आनंदी होईल. आपल्याला जीव लावणारी, प्रेम करणारी, एकनिष्ठ असलेली, आपल्याबद्दल अजिबात चुकीचं न वागणारी बोलणारी मित्र मंडळी, सांभाळणारी माणसं, आपलं कुटुंब दिवाळीत आपल्यासोबत आहेत हेच परमेश्वराने आपल्याला दिलेलं खूप मोठं गिफ्ट आहे हे समजून घेता आलं पाहिजे. या दिवाळीत हे समजावून घ्यायचं असेल तर समाजाची दुसरी बाजू पण प्रत्यक्ष डोळ्यांनी, स्वतः जवळून बघणं खूप आवश्यक आहे. आनंदी दिसणारी, श्रीमंत, संपन्न, समृद्ध, प्रगतिशील लोकं बघून स्वतःचा जीव जाळत असताना, दुसरीकडे अशीही लोकं आहेत ज्यांच्याकडे जे आपण उपभोगत आहोत ते सुद्धा उपलब्ध नाहीये. वृद्धाश्रमात राहणारे, दवाखान्यात गंभीर आजाराशी झुंझणारे, बेडला खिळलेले, अंध, अपंग, मनोरुग्ण, मानसिक, शारीरिक, विकलांग यांची दिवाळी कशी असते? हे प्रश्न स्वतःला विचारा. याही पलीकडे अनाथ निराधार मुलं, रस्त्यावर राहणारे भिकारी, कैदी यांची दिवाळी कशी असते? हे प्रश्न स्वतःला विचारा. याही पलीकडे अशा अनेक महिला ज्यांना हट्ट करायला नवराच नाही, घटस्फोटित, विधवा, अविवाहित त्यांच्या भावना काय असतील? ज्या वर्षानुवर्षे एकट्याच दिवाळी साजरी करत आहेत त्यांच्या भावना काय असतील? अशाही महिला ज्यांना ओवाळणी टाकायला भाऊच नाही, असे भाऊ ज्यांना बहिणी नाही किंवा होत्या पण आता त्या या जगात नाहीत. यासारख्या लोकांचा आपण विचार तरी करतो का हे स्वतःला विचारून बघा. समाजातील अत्यंत गोरगरीब ज्यांना राहायला घर नाही, घालायला कपडे नाहीत, दोन वेळचं जेवण नाही त्यांना दिवाळीत कोणत्या यातना होत नसतील का? आपण उरलेलं सुरलेलं एकत्र झालेलं, इकडून तिकडून आलेलं शिळे फराळ, पदार्थ देऊन जे लोकं आनंदाने खातात ते त्यावर दिवाळी साजरी करतात. दिवाळीआधी घर आवरताना आपण जे जुने कपडे देतो तेच नवीन समजून घालून जे दिवाळी साजरी करतात, आपण भंगार म्हणून फेकलेल्या वस्तू घरी नेऊन जे संसारात नवीन वस्तू आणली म्हणून खूश होतात त्यांना तीच दिवाळी वाटणार, यांचा विचार आपण करतो का?

# दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर मनोरंजनाचा डबल धमाका

- बहुप्रतीक्षित 'सिंघम अगेन' सोबत झळकणार जिओ स्टुडिओज आणि सुबोध भावेंच्या "संगीत मानापमान" चित्रपटाचा टिझर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जिओ स्टुडिओज आणि सुबोध भावे यांचा भव्यादिव्य चित्रपट "संगीत मानापमान" 10 जानेवारी 2025 ला आपल्या जवळच्या चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. रुपेरी पडद्यावर पहिल्यांदाच एक अद्वितीय अनुभूती देणारा संगीतमय सिनेमा असणार आहे त्यामुळे या चित्रपटातील संगीताच्या मेजवानी ची एक छोटीशी झलक आपल्याला टिझर मध्ये बघायला मिळेल. अभिनेते सुबोध भावे, सुमित राघवन आणि वैदेही परशुरामी ही त्रयी त्यांच्या मराठमोळ्या विलोभनीय अंदाजात मोठ्या पद्यावर प्रेक्षकांची मनं जिंकण्यास सज्ज झाली आहे. आज दिवाळी च्या शुभदिनी निर्मात्यांनी चित्रपटाचा टिझर सोशल मीडियावर पोस्ट केला आहे आणि विशेष म्हणजे हा टिझर प्रेक्षकांना रोहित शेट्टीच्या मोस्ट अवेटेड




मल्टी स्टारर चित्रपटा सोबत म्हणजेच "सिंघम अगेन" सोबत 1 नोव्हेंबरला सिनेमागृहात मोठ्या पडद्यावर पहायला मिळणार आहे. रोहित शेट्टी आणि सिंघम चे बरेच चाहते आहेत त्यामुळे सिनेमाघरांमध्ये आलेल्या प्रेक्षकांसाठी हा एन्टरटेन्मेंट चा डबल डोस नक्कीच म्हणता येईल. "संगीत मानापमान" या चित्रपटाच्या टिझरची सुरुवातच मधुर संगीताने होते. प्रसिद्ध संगीतकार शंकर-एहसान-लॉय यांचं संगीत या सिनेमाला लाभलं आहे.

केवळ संगीत नव्हे तर पारंपरिक नृत्य, तलवारबाजी आणि मोठाले सेट, विलोभनीय दृष्य अशा बऱ्याच गोष्टी टिझर मध्ये आहेत, जे हे खात्री पटवून देतात कि नक्कीच हा चित्रपट नवीन वर्ष गाजवणार आहे. या चित्रपटात एकूण 14 गाणी आहेत, तर ह्या गाण्यांना 16 दिग्गज गायकांनी आपला आवाज दिला आहे. इतकच नव्हे तर त्यातले 7 गायक हे नॅशनल अवॉर्ड विनर गायक आहेत. त्यामुळे चित्रपट पाहण्याचा अनुभव म्हणजे अद्वितीय गायकांनी सजवलेली मैफिल आहे. अभिनेते सुबोध भावे, सुमित राघवन आणि वैदेही परशुरामी सोबतच या चित्रपटात उपेंद्र लिमये आणि आणखी प्रसिद्ध कलाकार दिसणार आहे त्यामुळे नक्कीच चाहत्यांसाठी एक पर्वणी ठरणार आहे. अभिनेते सुबोध भावे यांनी चित्रपटा विषयी आपलं मत व्यक्त करताना सांगितले कि " मला आनंद होतोय की आज रोहित शेट्टी दिग्दर्शित "सिंघम अगेन" सारख्या चित्रपटा सोबत मराठी परंपरेचा साज राखणारा आणि सुरेल संगीताचा मान ठेवणारा "संगीत मानापमान" चित्रपटाचा टिझर मोठ्या पद्यावर झळकणार आहे. केवळ मराठी माणूस नव्हे तर महाराष्ट्रात राहणारे इतर तमाम प्रेक्षक आणि विशेषतः सिनेमा लव्हर्स जे सिनेमागृहात जातील त्यांच्यासाठी नक्कीच मोठ्या पडद्यावर हा टिझर बघणं एक वेगळाच अनुभव असेल. ह्या तमाम प्रेक्षकांपर्यंत टिझर पोहचवण्यासाठी मी जिओ स्टुडिओज चे मनःपूर्वक आभार मानतो.

हा सिनेमा नक्कीच एक मनोरंजनाची संगीतमय अविस्मरणीय भेट ठरणार आहे त्यामुळे मी खूप जास्त उत्सुक आहे कि संपूर्ण महाराष्ट्र आमच्या ह्या लार्जर दॅन लाईफ सिनेमाचा आस्वाद घेणार आहे आणि मी प्रेक्षकांची प्रतिक्रिया जाणून घेण्यास खूप उत्सूक आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत, निर्माती ज्योती देशपांडे, श्री गणेश मार्केटिंग निर्मित, सुबोध भावे दिग्दर्शित आणि अभिनित, "संगीत मानापमान" चित्रपट 10 जानेवारी 2025 पासून तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात प्रदर्शनास सज्ज आहे.

# व्हेरांडा लर्निंग सोल्युशन्सचे 600 कोटी रुपयांचा महसूल लक्ष्य गाठण्याचे उद्दिष्ट्य

**चेन्नई (दै. आरंभ पर्व)**

शैक्षणिक तंत्रज्ञान कंपनी असलेल्या व्हेरांडा लर्निंग सोल्युशन्स लि. शैक्षणिक क्षेत्रात एंड-टू-एंड सोल्यूशन्स ऑफर करणारी एक सूचीबद्ध एंटरप्राइझ असून कंपनीने 2025 या वर्षात 600 कोटी रुपयांचा महसूल गाठण्याचे उद्दिष्ट्य ठेवले आहे.

व्हेरांडा हायर एज्यू.ने अलीकडेच ऑस्ट्रेलियातील सिडनी येथील युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीच्या (UTS) भागीदारीत दोन अत्याधुनिक कमी कालावधीचे अभासक्रम सुरू केले आहेत. प्रो. जितेंद्र कांतीलाल शाह, प्रा. अशोक मिश्रा आणि सुश्री एन. अलामेलू यांच्यासह शिक्षण नेत्यांच्या समावेशासह कंपनीने आपले मंडळ मजबूत केले आहे.

कंपनीने मध्य पूर्वमध्ये प्रवेश केला आणि यूएईमध्ये सीए तयारी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी जुमेरा युनिव्हर्सिटी कनेक्टसह भागीदारी केली. श्री आदित्य मलिक यांची ग्रुप चीफ ऑपरेटिंग ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मे 2023 मध्ये कंपनीने 400 कोटी रुपये किमतीच्या सात कंपन्या विकत घेतल्या असून व्हेरांडा ग्रुपने 2024 या वर्षामध्ये 6,93,874 विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे . तर 2025 च्या पहिल्या तिमाहीमध्ये 113,262 विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले. 2018मध्ये कलापथी एजीएस समुहाने स्थापन केलेल्या कंपनीमध्ये सुमारे 55 टक्के हिस्सा आहे. अधिग्रहणाद्वारे कंपनीचा झपाट्याने विस्तार झाला आहे. मे 2023मध्ये, या समुहाने 400 कोटी रुपये किमतीच्या सात कंपन्या विकत घेतल्या. 27 सप्टेंबर 2024 रोजी झालेल्या 6 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कंपनीने 1000 कोटी रुपयांपर्यंत वाढीव कर्ज घेण्याची मर्यादा मंजूर केली. नॉन-कन्व्हर्टेबल डिबेंचर्स, बाँड्स किंवा इतर साधनांच्या इश्यूद्वारे त्याची वाढ आणि विस्तार योजनांसाठी हा निधी असणार आहे.

कंपनीने उत्कंठावर्धक वाढीच्या संधींचा फायदा घेत 2025 च्या पहिल्या तिमाहीमध्ये मजबूत परिचालन महसूल आणि आर्थिक कामगिरी कायम ठेवली आहे. या कालावधीत कंपनीचा परिचालन महसूल 118.99 कोटी रुपयांवरून 72.69 टक्क्यांची वाढ केली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत ही वाढ 68.90 कोटी रुपये होती. 2025 च्या पहिल्या तिमाहीमध्ये कंपनीचा इबिटा 5 पटीने वाढून 27.61 कोटी रुपयांवरून त्यात लक्षणीय वाढ झाली. गेल्या वर्षी याच तिमाहीत 5.64 कोटी रुपयांच्या वाढीची नोंद झाली होती.

> अलीकडे, व्हेरांडा हायर एज्यू. व्हेरांडा लर्निंग एंटरप्राईजेसने भारतातील कार्यरत व्यावसायिकांसाठी ऑस्ट्रेलियाथोस्थित युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी सिडनी (UTS) च्या भागीदारीत दोन अत्याधुनिक शॉर्ट कोर्सेस लाँच केले आहेत. ऑफरिंगमध्ये डिजिटल आणि सोशल मीडिया मार्केटिंग आणि बिझनेस ॲनालिटिक्समधील अभ्यासक्रमांचा समावेश आहे, जे आजच्या गतिशील व्यवसाय वातावरणात भरभराट होण्यासाठी आवश्यक कौशल्ये व्यावसायिकांना सुसज्ज करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.

व्हेरांडा लर्निंग सोल्युशन्सचे कार्यकारी संचालक आणि अध्यक्ष श्री. सुरेश कलपाथी म्हणाले, "कंपनीने आर्थिक वाढीच्या रोमांचक संधींचा फायदा घेत 225 च्या पहिल्या तिमाहीमध्ये मजबूत ऑपरेशनल आणि आर्थिक कामगिरी कायम ठेवली आहे. पारंपरिकपणे ऑफ-सीझन कालावधी असूनही पहिल्या तिमाहीत नेत्रदीपक वाढ झाली. ही भरीव वाढ कंपनीची वर्धित ऑपरेशनल कार्यक्षमता आणि तिच्या धोरणांची प्रभावी अंमलबजावणी हायलाइट करते. आम्ही 2025 या वर्षात 600 कोटी रुपयांचे महसुलाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्थिर आहोत, हा एक मैलाचा दगड ठरणार असून जो आमची उत्कृष्टतेची वचनबद्धता आणि या क्षेत्राच्या क्षमतेवरील आमचा विश्वास दर्शवितो."

# थोडक्यात



## माऊली कटके यांचा अर्ज दाखल

**लोणी काळभोर (आरंभ पर्व) :** अजित पवार या राष्ट्रीय नेतृत्वाकडे पाहूनच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या घड्याळाच्या चिन्हावर माऊली कटके यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन करत शिरूर हवेली विधानसभा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या वतीने ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांनी आज मोठे शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला .यावेळी हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता . यावेळी हवेलीतील अनेक गावचे आजी -माजी सरपंच आजी- माजी उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य तसेच सोसायटीचे पदाधिकारी व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामुळे शिरूर हवेलीला माऊली वादळ आल्याचे चित्र निर्माण झाले होते. यावेळी काढलेल्या रॅलीला प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार गटाचे विद्यमान आमदार अशोक पवार यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली असून त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे .त्यांना कडवे आवाहन निर्माण करत हवेलीमध्ये प्रथमच उमेदवारी मिळाल्याने माऊली कटके यांनी आपला उमेदवारी अर्ज मंगळवारी दाखल केला. ऐनवेळी महाविकास आघाडीतील ठाकरेंच्या शिवसेनेचे माजी जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर कटके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटात प्रवेश करून महाविकास आघाडीला तसेच ठाकरे गटाला जोरदार धक्का देत महाविकास आघाडीपुढे एक कडवे आव्हान उभे केले आहे.तसेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शांताराम कटके व भारतीय जनता पार्टीचे या मतदारसंघातील प्रबळ दावेदार जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. प्रदीप कंद यांनी देखील कार्यकर्त्यांचा मेळावा घेऊन शक्ती करून आपण ही कार्यकर्त्यांच्यां आग्रहा खातर उमेदवारी अर्ज दाखल केला आहे . त्यामुळे नेमकी दुरंगी की तिरंगी लढत होणार याकडे सर्वसामान्य जनतेचे लक्ष लागून राहिले आहे. पुन्हा एकदा लोकसभेसारखी विधानसभेची निवडणूक दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात तुल्यबळ लढत होणार आहे.

## रिपब्लिकन पक्ष महायुतीचा प्रचार करणार; प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती

**पुणे(आरंभ पर्व) :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्ष हा शिवसेना भाजप राष्ट्रवादी महायुतीचा घटक पक्ष आहे. राज्याच्या विधानसभा निवडणूकीत रिपब्लिकन पक्षाला महायुतीतून 10 ते 12 जागा मिळाव्यात अशी पक्षाची आग्रही मागणी होती. जागांची मागणी मान्य होत नसल्याने पक्षाचे नेते, कार्यकर्ते आक्रमक झाले होते व पक्षाचा कोणताही पदाधिकारी महायुती च्या व्यासपीठावर जाणार नाही अशी भूमिका घेण्यात आली होती. अखेर महायुती मध्ये काल मुंबईत धारावी आणि कालिना हे दोन मतदार संघ देण्यात आले आहेत.

# थोडक्यात

## अरुंधती सरकार यांची निरिक्षकपदी नियुक्ती



**राजगुरुनगर (आरंभ पर्व)** : राजगुरुनगर येथील 197 खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाकडून निवडणूक निरिक्षक म्हणून श्रीमती अरुंधती सरकार (आयएएस) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा निवासी पत्ता, व्हीव्हीआयपी विश्रामगृह, कक्ष क्रमांक 203, ग्रीन बिल्डींग, क्वीन्स गार्डन, पुणे 411001 असा असून त्यांचा संपर्क क्रमांक 020 - 29516319 तर मोबाईल क्र. 9322755023 असा आहे. त्यांचा ईमेल आयडी gobserver197198@gmail.com असा आहे. तसेच निवडणूक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी राजकुमार पाटील हे असून त्यांचा संपर्क क्रमांक 9892085362 असा आहे. निवडणूक निरीक्षक यांना व्हीव्हीआयपी विश्रामगृह, पुणे येथे भेटण्याची वेळ सकाळी 10 ते 11 वाजेपर्यंत आहे. नागरीकांच्या सुचना व तक्रार निवारण यासाठी ही माहीती निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रसिद्ध केली आहे. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी दिली.

## गजराबाई चौधरी यांचे निधन



**उरुळी कांचन (आरंभ पर्व)** : सोरतापवाडी (ता. हवेली) गजराबाई शिवाजी चौधरी यांचे वयाच्या 90 व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नागरी संघाचे प्रदेशाध्यक्ष सोनबा चौधरी यांच्या त्या मातोश्री तर सोरतापवाडी ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच संध्या चौधरी यांच्या त्या आजीसासू होत.

## प्रा. सुरेश गुजराथी यांचे निधन



**राजगुरुनगर (आरंभ पर्व)** : राजगुरुनगर येथील सामाजीक कार्यकर्ते प्रा. सुरेश रघुनाथ गुजराथी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते 77 वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी व एक भाऊ, असा परिवार आहे. मंचर (ता. आंबेगाव) येथील रयत शिक्षण संस्थेच्या आण्णासाहेब आवटे महाविद्यालयात त्यांनी सुमारे चाळीस वर्षे अध्यापनाचे कार्य केले. ते एक विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून ओळखले जात. कर्मवीर भाऊराव पाटील व त्यांच्या कार्याबद्दल त्यांना प्रचंड आदर होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांना ते आपला आदर्श मानत. गुजराथी यांनी त्यांच्या दिर्घ पाठपुरावा व प्रयत्नातून आण्णासाहेब आवटे महाविद्यालयाला शासनाकडून पन्नास एकर जमीन मिळवून दिली. येथील राजगुरुनगर वैष्णव गुजराथी समाज मंडळाचे ते सचिव म्हणून कार्यरत होते. अमरज्योत चॅरीटेबल ट्रस्ट, सार्वजनिक वाचनालय, वैष्णव गुजराथी समाज मंडळ आदी विविध सामाजिक संस्था व मंडळांना ते प्रतिवर्षी आर्थिक मदत देत असत. नाशिक येथील वैष्णव गुजराथी समाज मंडळाच्या वतीने त्यांचा समाजभुषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला होता. येथील अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्ययात्रेस मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## खेड-आळंदी विधानसभेसाठी 23 उमेदवारांनी केले 34 अर्ज दाखल

**राजगुरुनगर (आरंभ पर्व)** : राजगुरुनगर येथील खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघात गेल्या सहा दिवसात 46 व्यक्तींनी 103 उमेदवारी अर्ज नेले होते. त्यापैकी प्रत्यक्षात 23 उमेदवारांनी 34 अर्ज दाखल केले आहेत. यामध्ये बहुजन समाज पक्षाचे अनिकेत गोरे, महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे अक्षय जाधव, वंचित बहुजन आघाडीचे रविंद्र रंधवे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बाबाजी काळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) दिलीप मोहिते यांनी पक्षाचे अधिकृत एबी फॉर्म जमा केले आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या नवीन (इनाम वर्ग ६ ब) नवीन मिळकत ही १) निवृत्ती बाबुराव शिंदे, २) नामदेव रघुनाथ शिंदे, ३) रमेश रघुनाथ शिंदे, ४) कल्याण रघुनाथ शिंदे, ५) अलका अरूण पोव्हाळ सर्व रा. शिरोली, ता. खेड, जि. पुणे. ४१०५०५. यांचे वडिलोपार्जित मालकी व वहिवाटीच्या असून सदर जमिन मिळकत त्यांनी " सौ. वंदना संजय गावडे," वय ४५ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा. राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे. ४१०५०५, यांना कायमस्वरूपी खुशखरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. सदर मिळकतीवर इतर बक्षीस, गहाण, दान, लीज, पोटगी, चोळीबांगडी, खरेदी, साठेखत, करार, मदार, कुळ, वहिवाट, विसारपावती, इत्यादी कोणत्याही स्वरूपाचा हक्कसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत मा. जिल्हाअधिकारी / तहसिल कार्यालयात मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास ते जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत. असे समजुन सदरचा व्यवहार पुर्ण करणेत येईल व नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, यांची नोंद घेणेत यावी. १) निवृत्ती बाबुराव शिंदे, २) नामदेव रघुनाथ शिंदे, ३) रमेश रघुनाथ शिंदे, ४) कल्याण रघुनाथ शिंदे ५) अलका अरूण पोव्हाळ, सर्व रा. शिरोली, ता. खेड, जि. पुणे. ४१०५०५. या सर्व वारसदारांनी मा. जिल्हाअधिकारी यांचेकडे विक्री परवानगी मागितलेली आहे. सदरची जमिन "सौ वंदना संजय गावडे" यांना प्रतिगुंठा २,२७,२७२/-प्रमाणे विक्री करणार आहेत. शासन परिपत्रक नंबरः डब्लूटीएन/१०९९/सीआर/२२९/लननः४, दि.१० मार्च सन २००० मधील मुबई गांवची कनिष्ठ वतने नाहीशी करणेबाबत अधिनियम १०५८ मधील दिलेल्या सुचनेनुसार गांवचे ५ किमी परिसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमिन उक्त नमुद किंमतीस खरेदी घेण्यास इच्छुक १५ दिवसांचे आत तहसिल कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय यांना कळवावे.

परिशिष्ट : जि.पुणे, ता. खेड, गांवः शिरोली.

मिळकतीचे वर्णन :- खाते क्र. १४२५ या खात्यावरील जमिन गट नंबरः ४६९, यांसी क्षेत्र ००.४६ आर, आकार ००. ७० पैसे, पो.ख.००.०० पैसे. यापैकी अर्जदार यांचे स्वतंत्र मालकी वहिवाटीचे क्षेत्र ०० हेक्टर ११ आर यांसी आकार ००.१५ पैसे. यांसी चतुःसिमा पुर्वेसः चासकमान चारी, पश्चिमेसः याचगटातुन जाणारा पालखी रस्ता, दक्षिणेसः याच गटातुन जाणारा पालखी रस्ता, उत्तरेसः याच गटातील हरीभाऊ रामभाऊ बोऱ्हाडे यांची जमिन मिळकत.

सही/-
ॲड. नवनाथ धोंडीभाऊ बाळसराफ
ऑ.शिवपुष्प दुबे कॉम्प्लेक्स, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे.
मोबा. ९९६०८३०१८३/९८२२४३२९६२

दि.:२६/१०/२०२४
ठिकाण : जुन्नर


# आबा बागुल यांच्या प्रचार रॅलीला उस्फुर्त प्रतिसाद

## काँग्रेस भवन येथून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या एम पुष्पहार अर्पण करून रॅलीचा शुभारंभ

- छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले.



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पर्वती विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार आबा बागुल यांनी बुधवारी हजारो कार्यकर्ते व नागरिकांच्या उपस्थितीत आपल्या प्रचार रॅलीचा धुमधडाक्यात प्रारंभ केला. काँग्रेस भवन येथून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून या रॅलीची सुरवात केली. यावेळी उपस्थितांनी श्री बागुल यांचा प्रचंड मतांनी विजय करण्याचा निर्धार व्यक्त केला. आबा बागुल यांच्या प्रचारार्थ दुचाकी रॅलीचे बुधवारी सकाळी आयोजन करण्यात आले. सकाळी दहा वाजता शिवदर्शन येथील राजीव गांधी अकॅडमी ऑफ ई लर्निंग येथून ही दुचाकी रॅली सुरू झाली. या रॅलीत तरुणाई बरोबरच ज्येष्ठ नागरिक, महिला ही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. यावेळी आबा बागुल हम तुम्हारे साथ हे च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. दरम्यान पर्वती मतदार संघातील काँग्रेसचे शेकडो निष्ठावंत कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. आबा तुम्ही घेतलेली भूमिका अत्यंत योग्य आहे. आम्ही आपल्या मागे खंबीरपणे उभे आहोत, तुमचा विजय निश्चित आहे, आशा भावना त्यांनी यावेळी बोलून दाखविल्या.

ही बाईक रॅली राजीव गांधी अकॅडमी ऑफ ई लर्निंग - लक्ष्मी नगर – पर्वती गाव – जनता वसाहत – हिंगणे – महादेवनगर – आनंदनगर – विठ्ठलवाडी – दत्तवाडी – गणेशमळा -पानमळा - दांडेकर पूल – निलायम ब्रिज येथून पुढे पर्वती दर्शन येथे समाप्त झाली. वाहतुकीला अडथळा येऊ नये अशा पद्धतीने रस्त्यावरून या बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

पर्वती मतदार संघातील परिवर्तनासाठी या बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. अशा भावना श्री आबा बागुल यांनी यावेळी व्यक्त केल्या. तसेच आपला विजय निश्चित असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. आपण काँग्रेसचे विचार जे महात्मा गांधी यांनी दिले ते कायम पुढे ठेवण्यासाठी हे पाऊल उचलले असल्याचे सांगितले.

## आळंदी रस्त्यावरील कळस गावात दोन गटात हाणामारी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आळंदी रस्त्यावरील कळस गावठाणात वैमनस्यातून दोन गटात हाणामारी झाल्याची घटना घडली. हाणामारीत चौघे जखमी झाले असून, याप्रकरणी परस्परविरोधी फिर्यादीवरुन सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राहुल भीष्मा चव्हाण (वय 24, रा. कळस ) याने विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चव्हाण याने दिलेल्या फिर्यादीनुसार रोहित लोखंडे (रा. दिघी), गगन लाड (रा. टिंगरेनगर) आणि स्वप्नील महाजन (रा. कळस) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चव्हाण सोमवारी रात्री साडेअकराच्या सुमारास कळस गावातील स्मशानभूमीजवळून निघाला होता. त्यावेळी रोहित लोखंडे, गगन लाड यांनी त्याला बेदम मारहाण केली. त्याच्यावर चाकू आणि गजाने हल्ला करण्यात आला. मारहाणीत चव्हाण जखमी झाला, असे चव्हाणने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

## बार्शीच्या राजकारणात राऊत-डिसले जोडी पुन्हा एकत्र

- तालुक्याच्या राजकारणाला पुन्हा एकदा कलाटणी..!



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

तालुक्यातील राजकारणात हल्लीच एक अनपेक्षित वळण आले आहे. लोकसभा निवडणुकीनंतर मतभेदामुळे दूर गेलेले अनिल डिसले आणि आमदार राऊत पुन्हा एकत्र आले आहेत. निवडणुकीदरम्यान दोघांमध्ये वाद विकोपाला गेले होते. मात्र बार्शी तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर ही जोडी पुन्हा एकदा बार्शी तालुक्याच्या राजकारणात एकत्र आली आहे. त्यामुळे राऊत गटातील कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य पसरले आहे. अनेक न्यायालयीन अडचणींना सामोरे गेलेल्या डिसले यांना जमीन फेटाळण्यात आली होती. या सर्व घटनाक्रमानंतर डिसले आणि राऊत यांच्यातील एकोपा पुन्हा दिसू लागला आहे. नुकतेच उमेदवारी अर्ज भरताना दोघे एकत्र दिसून आले, आणि या घटनेने तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये नव्या उलथापालथीची चर्चा सुरू झाली आहे. राजकीय समीकरणाचे महत्त्व! डिसले यांच्या या पुनर्प्रवेशामुळे त्यांच्या अडचणी कमी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिवाय आमदार राजाभाऊ राऊत यांच्याकडे असलेले अनेक कार्यकर्ते जोरदार प्रचाराला लागणार आहेत. या नव्या समीकरणामुळे दोन्ही गटांचा लाभ होण्याची शक्यता आहे.

## पुणे : नवले पूलावर अपघात; एक ठार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुंबई-बंगळुरु बाह्यवळण मार्गावरील नवले पूल परिसरात ब्रेक निकामी झालेला ट्रकने क्रेनला धडक दिली. अपघातात ट्रकचालकाचा जागीच मृत्यू झाला. अपघातात ट्रकमधील मदतनीस गंभीर जखमी झाला. सलीम मकबूल शेख (वय 58, रा. उमरगा, जि. धाराशिव) असे अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या ट्रक चालकाचे नाव आहे. अपघातात ट्रकमधील मदतनीस (क्लिनर) समीर आयुब मोमीन हा जखमी झाले आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाह्यवळण मार्गावरुन कात्रजकडून नवले पुलाकडे बुधवारी दुपारी दोनच्या सुमारास ट्रक निघाला होता. ट्रकचे ब्रेक निकामी झाल्याचे लक्षात आल्यानंतर ट्रकचालक सलीम शेख यांनी ट्रक सेवा रस्त्यावर नेला. सेवा रस्त्यावर थांबलेल्या क्रेनवर ट्रक आदळला.

गंभीर जखमी झालेल्या शेख यांचा जागीच मृत्यू झाला. मदतनीस समीर केबीनमध्ये अडकले. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. केबीनध्ये अडकलेले मदतनीस समीर यांची जवानांनी सुटका केली. अपघातानंतर काही वेळ सेवा रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

बाह्यवळण मार्गावर गंभीर स्वरुपाचे अपघात घडतात. अपघात रोखण्यासाठी पोलीस, महामार्ग प्राधिकरणाने या परिसरात वाहतूक विषयक उपाययोजना केल्या. बाह्यवळण मार्गावर नवीन कात्रज बोगदा ते नवले पूल परिसरात तीव्र उतार आहे. तीव्र उतारावर अवजड वाहनांचे ब्रेक निकामी होऊन अपघाताच्या घटना घडतात. या भागात अपघातांचे प्रमाण लक्षात घेऊन तेथे अवजड वाहनांसाठी वेगमर्यादा निश्चित करण्यात आली आहे, तसेच वेग कमी करण्यासाठी गतीरोधक पट्टिका (रम्बलिंग स्ट्रीप) बसविण्यात आल्या आहेत. वाहतूक विषयक उपाययोजनांमुळे गेल्या काही महिन्यांपासून नवले पूल परिसरात गंभीर स्वरुपाच्या अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे.

## लूटमार करणाऱ्या चोरट्याकडून दोन पिस्तुलांसह काडतुसे जप्त

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरात लूटमार करणाऱ्या चोरट्याकडून विश्रामबाग पोलिसांनी दोन पिस्तुलांसह चार काडतुसे जप्त केली. नवी पेठेतील शास्त्री रस्ता परिसरात ही कारवाई करण्यात आली. रफिक सलीम खान (वय 36, रा. जिवलग हाऊसिंग सोसायटी, निगडी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. नवी पेठेतील शास्त्री रस्ता परिसरातून पादचारी महिलेच्या गळ्यातील दागिने हिसकावून नेण्याची घटना घडली होती. या गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलिसंचे पथक गस्त घालत होते.

शास्त्री रस्त्यावर पादचारी महिलेच्या गळ्यातील दागिने रफिक खान याने हिसकावून नेल्याची माहिती तपास पथकातील पोलीस कर्मचारी सचिन कदम यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली.

# विबग्योरने वीवाचे 16 वे एडिशन लॉंच केले

- क्रिएटिव्हिटी, टॅलेंट आणि उत्कृष्टतेचा एक रोमांचक उत्सव
- या वर्षीच्या विवामध्ये डान्सर्स आणि संगीतकारांपासून ते कवी आणि बीटबॉक्सरपर्यंत अनेक टॅलेंटेड व्यक्ती दिसतील
- सहभागींना पाच यूनिक राऊंड पार करावे लागतील, प्रत्येक राऊंड त्यांची क्रिएटिव्हिटी आणि व्यक्तिमत्व प्रदर्शित करण्यासाठी तयार करण्यात आला आहे
- विजेते मोठ्या रोख बक्षिसांसाठी स्पर्धा करतील, ज्यामध्ये 2,25,000 रुपयाचे भव्य रोख बक्षीस समाविष्ट आहे



विवा 16 व्या वर्षात प्रवेश करत असताना, आम्ही आमच्या उत्कृष्टतेची परंपरा पुढे चालू ठेवण्यास उत्सुक आहोत आणि विद्यार्थ्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देत आहोत जिथे क्रिएटिव्हिटी वाढते आणि टॅलेंटेचा आदर केला जातो. विबग्योर विवा ही केवळ स्पर्धा नाही; हा उत्कटतेचा, कठोर परिश्रमाचा आणि भविष्यातील तरुण स्टार्सची वाट पाहणाऱ्या अंतहीन शक्यतांचा उत्सव आहे.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

K-12 इन्स्टिट्यूशन्सची एक अग्रगण्य शृंखला, विबग्योर ग्रुप ऑफ स्कूल्सने त्यांच्या फ्लॅगशिप इव्हेंट विवाच्या 16व्या एडिशनची अभिमानाने घोषणा केली. विवा हे विद्यार्थ्यांची क्रिएटिव्हिटी, टॅलेंट आणि उत्कृष्टता वाढवणारे आणि जोपासणारे एक प्रमुख व्यासपीठ आहे. 5 ऑक्टोबर 2024 पासून देशभरात अनेक ठिकाणी सुरु झालेला, या वर्षीचा, ‘द स्टार्स एन्सेम्बल’ हा इव्हेंट कलात्मक आणि ॲथलेटिक कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करण्याचे वचन देतो, विवा प्रथमच जागतिक स्तरावर पोहचल्याने हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. बहुप्रतिक्षित विबग्योर विवा ग्रॅंड फिनाले 15 डिसेंबर रोजी बेंगळुरु शहरात होणार आहे, जिथे टॉप सहभागी 2,25,000 रुपयाच्या प्रतिष्ठित भव्य रोख बक्षीसासाठी स्पर्धा करतील.

जगभरातील सहभागींना या रोमांचक महोत्सवात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले आहे, जिथे त्यांना ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही प्रकारे नोंदणी करण्याचा आणि सहभागी होण्याचा पर्याय असेल. हा जागतिक विस्तार विद्यार्थ्यांना आंतर-सांस्कृतिक संबंध वाढवताना त्यांचे कलागुण आणि क्रिएटिव्हिटी आंतरराष्ट्रीय मंचावर दाखवण्याची अनोखी संधी देतो. विद्यार्थी www.vibgyorviva.com या ऑफिशियल वेबसाइटवर नोंदणी करू शकतात. विबग्योर विवा हे स्थापनेपासून एक अग्रगण्य व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे, ज्याचा फायदा 200,000 हून अधिक विद्यार्थी आणि 5000 हून अधिक शाळांना झाला आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या अद्वितीय क्षमता ओळखण्यासाठी संधी उपलब्ध करून देण्याच्या विबग्योरच्या वचनबद्धतेचा हा महोत्सव एक पुरावा आहे. रचनात्मक कला, क्रीडा, स्पर्धा आणि व्यक्तिमत्त्व-आधारित कार्यशाळा यासारख्या विविध शैलींमधील विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन, विद्यार्थी महत्वपूर्ण कौशल्ये विकसित करू शकतात, आत्मविश्वास वाढवू शकतात आणि राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दोन्ही क्षेत्रात यश मिळवू शकतात. क्रिएटिव्हिटी आणि उत्कृष्टतेच्या या वचनबद्धतेने शाळेला केवळ प्रशंसाच मिळवून दिली नाही तर भविष्यातील यशासाठी विद्यार्थ्यांना तयार केले आहे.

कविता केरावल्ला, व्हाईस चेअरपर्सन, विबग्योर ग्रुप ऑफ स्कूल्स म्हणाल्या, “विवासाठी आमचे उद्दिष्ट नेहमीच असे वातावरण निर्माण करणे आहे जिथे क्रिएटिव्हिटी वाढेल आणि प्रतिभेला जोपासले जाईल. “विवा केवळ एक स्पर्धा नाही; हा प्रत्येक मुलामध्ये लपलेल्या अविश्वसनीय क्षमतेचा उत्सव आहे. सर्व क्षेत्रात विद्यार्थ्यांना प्रगती करण्यास आणि यशस्वी होण्यासाठी विवाने दिलेल्या व्यासपीठाचा आम्हाला अभिमान आहे. या वर्षीची आवृत्ती, ‘द स्टार्स एन्सेम्बल’, विशेषत: उत्साहवर्धक आहे कारण आम्ही नवकल्पना आणि यशाची 16 वर्षे साजरी करत आहोत.”

या वर्षीच्या विवामध्ये, विविध पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यासाठी प्रभावी कार्यक्रम आणि कार्यशाळांची योजना आखली आहे. सहभागींना ओरिगामी, बीटबॉक्सिंग, पपेट मेकिंग, चॉकलेट मेकिंग आणि टी-शर्ट डिझायनिंग यासारख्या क्रियाकलापांमध्ये भाग घेण्याची संधी मिळेल. या वर्षीच्या कार्यक्रमाची रचना पाच रोमांचक टप्प्यांमध्ये केली आहे:

रेडिएट (राऊंड 1): एक रॅपिड-फायर राऊंड ज्यामध्ये स्पर्धकांनी ठराविक कालावधीत जजेसना प्रभावित करणे आवश्यक आहे.

एलिव्हेट (राऊंड 2): स्पर्धक नवीन कल्पनांसह त्यांचे प्रेझेन्टेशन अधिक चांगले बनवतील, नवकल्पना आणि उत्कृष्ट कार्य करण्याची त्यांची क्षमता प्रदर्शित करतील.

एक्सेलरेट (नॉकआउट राऊंड): मूळ परफॉर्मन्सचे एक प्रदर्शन जे व्यक्तिमत्त्वावर जोर देते आणि कायमस्वरूपी प्रभाव टाकण्याचे उद्दिष्ट ठेवते.

सेमी-फायनल: निवडलेल्या स्पर्धकांना त्यांचे वेगळेपण दाखवून जजेसवर कायमस्वरूपी प्रभाव पाडण्याची संधी मिळेल.

ग्रॅंड फिनाले: टॉप फायनलिस्ट स्पर्धक ख्यातनाम व्यक्ती आणि सन्माननीय जजेससह भव्य बक्षीसासाठी स्पर्धा करतील, अंतिम विजेत्याला 2,25,000 रुपयांचे रोख बक्षीस मिळेल.

विबग्योर विवा मिनीथॉन 2024 चे आयोजन 6 ऑक्टोबर 2024 रोजी विबग्योर राइज, मालाड पश्चिम, मुंबई येथे करण्यात आले होते.

या वर्षीचा कार्यक्रम हा विवा मिनी-मॅरेथॉन, क्लायमेट अकादमी आणि सीयूटीएक्स पर्सेंट यांच्यातील एक उल्लेखनीय सहयोग होता, ज्याने कुटुंबे, तरुण खेळाडू आणि हवामान समर्थकांना मौज-मस्ती, फिटनेस आणि पर्यावरणविषयक जागरूकतेने भरलेल्या दिवसासाठी एकत्र आणले. विबग्योरने पर्यावरणीय शाश्वतता स्वीकारून आणि प्रोत्साहन देऊन उत्कृष्टतेचा वारसा सुरु ठेवला आहे. सहभागी आणि त्यांची कुटुंबे मनापासून हा उद्देश स्वीकारतात आणि या रोमांचक कार्यक्रमाच्या प्रत्येक टप्प्यावर निरोगी जगासाठी योगदान देतात.

# खा. सुप्रिया सुळेंनी शब्द फिरवला!

- ठाकरेंच्या शिवसैनिकांचा महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा प्रचार करण्यास नकार
- संदीप मते, नितीन वाघ यांची आक्रमक भूमिका

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
लोकसभा निवडणुकीत बारामती मतदार संघात शिवसेना (ठाकरे)खासदार सुप्रिया सुळे यांचा जोमाने प्रचार केल्यामुळे खडकवासल्यातून चांगले मतदान झाले. विधानसभा निवडणूकीच्या वेळी खडकवासला मतदार संघ शिवसेनेला देण्याची तयारी दाखवण्यात आली होती. शिवसेनेने सुद्धा जोरदार तयारी केली होती. मतदार संघ शिवसेनेला सुटत नाही असे लक्षात आल्यानंतर देखील पदाधिकारी यांनी मुंबई येथे जाऊन खा . सुप्रिया सुळेंची भेट घेतली.

या प्रसंगी त्यांनी खडकवासला मतदार संघ शिवसेनेला देण्याची तयारी दाखवली फक्त त्याबदल्यात दुसरा मतदार संघ मिळावा हि अपेक्षा व्यक्त केली. परंतु दुसऱ्याच दिवशी त्यांनी मागणी केलेल्या भूम परांडा या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार जाहीर करून खडकवासला मतदार संघातील उमेदवाराची देखील घोषणा करून टाकली. त्यामुळे खडकवासला मतदार संघातील सर्व कार्यकर्ते नाराज झाले असून महाविकास आघाडीचे काम न करण्याचा निर्णय खडकवासला विधानसभा मतदारसंघातील शिवसेना ( ठाकरे) शिवसैनिकांनी घेतला आहे.

त्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवारांना धक्का बसणार आहे. कारण खडकवासला विधानसभा मतदारसंघातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे चांगले प्राबल्य आहे. अशीच परिस्थिती राहिल्यास महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीत देखील शिवसेना ठाकरे गटातील कार्यकर्त्यांवर अन्याय होऊ. त्यामुळे या घडामोडीचा फेरविचार व्हावा. अशी मागणी शिवसैनिक करत आहेत. खडकवासला विधानसभेसाठी संदीप मते पाटील ,नितीन वाघ यांनी जोरदार तयारी केली होती.

मात्र ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला गेल्यामुळे त्यांना उमेदवारीची संधी मिळाली नाही. यामुळेही शिवसैनिक नाराज आहेत.

नुकतीच खडकवासला विधानसभेतील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस शहर प्रमुख गजानन थरकुडे, उपशहर प्रमुख भरत कुंभारकर, विधानसभा प्रमुख नितीन वाघ, निवडणूक समन्वयक सचिन पासलकर, तालुका प्रमुख तानाजी पवळे, मा. तालुका प्रमुख संदीप मते, विभाग प्रमुख मनीष जगदाळे, महेश मते, योगेश पवार, अमोल दांगट, राजू चव्हाण, शिवाभाऊ पासलकर, नाना मरगळे, रामदास गायकवाड, भरत गोगावले, पप्पू गायकवाड, संतोष शेलार, विजय कोल्हे,विनोद वांजळे, महेश विटे,धनंजय खाडे, निवृत्ती वाव्हळ, विकास कांबळे, आकाश यादव तसेच महिला आघाडीच्या सुनीता खंडाळकर, रेखा कोंडे हे उपस्थित होते.

## ...तर विजय मिळाला असता : संदीप मते



खडकवासला विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षांमध्ये अंतर्गत संघर्ष सुरू आहे. त्यामुळे ह्या राजकारणात खडकवासला विधानसभा मतदारसंघाची जागा धोक्यात आली आहे. त्यांच्या पक्षामध्ये अंतर्गत संघर्षाची पूर्वीपासूनच परंपरा कायम आहे. त्यामुळेच त्यांना आतापर्यंत विधानसभेला अपयश आले आहेत. ही जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाला दिली असती तर मतदारांनी नक्कीच संधी दिली असती. खा.सुप्रिया सुळे यांनी आम्हाला विधानसभेचा शब्द दिला होते मात्र दुसऱ्याच दिवशी त्यांनी उमेदवार घोषित केला. त्यांनी हा शब्द फिरविला. आम्हा शिवसैनिकाचा भ्रमनिरास केला. त्यामुळे शिवसैनिकांनी महाविकास आघाडीचे उमेदवारांचा प्रचार न करण्याचे धोरण अवलंबले आहे. याबाबत पक्षालाही कळवले आहे.

- संदीप मते, मा .तालुकाप्रमुख हवेली

## अन्याय सहन होणार नाही : नितीन वाघ



मागील लोकसभा निवडणुकीमध्ये आम्ही प्रामाणिकपणे खा. सुप्रिया सुळे यांचे काम केले. खा. सुप्रिया सुळे आम्हाला विधानसभेचा शब्द दिला होता. व ऐनवेळी उमेदवार घोषित केला .हा शिवसैनिकांवर अन्याय झाला आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीमध्ये आम्ही त्यांच्या पक्षाच्या उमेदवाराचे काम करणार नाही असा निर्णय घेत आहोत.ह्या शिवाय पुणे शहरात एकच आणि जिल्ह्यात देखील एकच जागा मिळाल्यामुळे सर्व शिवसैनिक नाराज झाले आहेत. याचा परिणाम महाविकास आघाडीच्या मतांवर नक्कीच होईल. शिवसैनिक हा अन्याय सहन करणार नाहीत.

- नितीन वाघ, विधानसभा प्रमुख

# पंचवीस वर्षे पवारांसोबत; यापुढेही काम करत राहील

### पक्षाचा खडकवासल्याचा आमदार करणार हेच ध्येय : काकासाहेब चव्हाण यांची स्पष्ट भूमिका

## उमेदवारी माझा हक्क होता परंतु पक्षाचा निर्णय मान्य



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला विधानसभा निवडणुकीबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते ,विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काकासाहेब चव्हाण यांनी आपली भूमिका मांडली आहे. पंचवीस वर्षे शाहू फुले आंबेडकर विचारसरणी ला मानून व पवारसाहेबाना साथ दिली. यापुढेही साथ देईन पक्षाच्या उमेदवाराला विजय करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. असे मत काकासाहेब चव्हाण यांनी व्यक्त केले आहे.राष्ट्रवादी काँग्रेस (एस. पी) उमेदवारीवरून नाराजी नाट्य झाले. यामुळे काकासाहेब चव्हाण यांच्या भूमिकेविषयी मतदारसंघात चर्चा सुरु होती. त्यावर अखेर पडदा पडला आहे. पुढे बोलताना त्यांनी खडकवासला विधानसभा मतदारसंघासाठी मीही योगदान 25 वर्षापासून प्रयत्न करत आहे. त्यामुळे उमेदवारीसाठी मी ही इच्छुक होतो. कारण तोमाझा हक्क होता. मात्र माझ्यापेक्षा इतरांमध्ये काहीतरी मेरीट जास्त असल्यामुळे उमेदवारी मिळाली. पक्षाचा एकदा निर्णय झाला की झाला. असो. झालं गेलं विसरून मी पुन्हा नव्या उमेदीने खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीचा आमदार करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. खडकवासला विधानसभा मतदारसंघातील आपल्या पक्षाला आजपर्यंत पाडापाडीच्या राजकारणामुळे आमदार मिळू शकला नाही. तो डाग माझ्यावर लागू नये यासाठी मी खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या उमेदवाराच्या विजयासाठी नक्की प्रयत्न करणार आहे.

सर्वांनी मिळून मिसळून जर एकत्र काम केलं तर खडकवासल्याचां आमदार नक्की आपला होईल. यात मला शंका नाही. असा विश्वासही काका चव्हाण यांनी व्यक्त केला आहे.

# डिवाइन जैन ग्रुपने पुणे रेल्वे स्टेशनला दिले बॅरिकेड्स



**उरुळी कांचन (आरंभ पर्व)** : दिवाळीच्या या पवित्र प्रसंगी डिवाइन जैन ग्रुपने पुणे रेल्वे स्टेशनवर सामाजिक सेवेत एक आदर्श निर्माण केला. श्री. मदनलाल मीणा सर (IRTS) यांच्या मार्गदर्शनाखाली, या उपक्रमांतर्गत प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून स्टेशनवर बॅरिकेड्सचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश प्रवाशांची सुविधा लक्षात घेऊन त्यांच्यात मतदानाबद्दल जागरुकता निर्माण करणे हाही होता. ग्रुपचे अध्यक्ष संकेत शहा यांनी प्रत्येक नागरिकाने आपल्या मतदानाच्या अधिकाराचा योग्य वापर करणे हे आपले कर्तव्य असल्याचे अधोरेखित केले. या प्रसंगी ग्रुपचे इतर प्रमुख सदस्य रोनक शहा, मेहुल शहा (कॉसमॉस ग्रुप), अमित जनजानी, प्रशांत कुमार, तनीष जैन यांनी देखील आपली उपस्थिती दर्शवली आणि या आगळ्या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी आपले योगदान दिले.

# आ. सिद्धार्थ शिरोळे यांची उमेदवारी दाखल

- शिरोळे यांच्या पदयात्रेने वेधले लक्ष



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
छत्रपती शिवाजीनगर (209) मतदारसंघाचे भाजपा-महायुतीचे अधिकृत उमेदवार विद्यमान आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी उमेदवारी अर्ज काल दाखल केला आहे. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महाराष्ट्र राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, भाजपा प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे ,गणेश बिडकर , दत्ता भाऊ खाडे, राष्ट्रवादी काँग्रेस (छ. शिवाजीनगर अध्यक्ष) अभिषेक बोके, शिवसेना (छ. शिवाजीनगर प्रमुख ) युवराज शिंगाडे, सुनील पांडेजी, अमोल बालवडकरजी, प्रकाश ढोरेजी, भाजपा छ. शिवाजीनगर अध्यक्ष गणेश बगाडे, व महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी मोठी पदयात्रा काढण्यात आली. यामध्ये हजारो कार्यकर्ते सहभागी झाले. त्यामुळे शिवाजीनगर मतदार संघामध्ये भारतीय जनता पार्टी ला चांगले वातावरण असल्याची पुष्टी मिळाली आहे. आमदार शिरोळे हे मोठ्या मताधिक्याने निवडणुकीत जिंकतील असा विश्वास कार्यकर्त्यांना वाटत आहे.

## मतदारावर विश्वास; विजय मिळेल : आ. शिरोळे

अर्ज भरल्यानंतर प्रतिक्रिया देताना आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आभार मानले. छत्रपती शिवाजीनगर मतदारसंघातील विकासाचे मॉडेल यापुढेही अशाच प्रकारे कार्यरत राहील. राज्य शासनाच्या मार्फत विविध योजना राबवण्याचा नक्कीच प्रयत्न केला जाईल. माजी विकास कामे व मतदारांचा विश्वास यामुळे मला मोठा विजय मिळेल हा आत्मविश्वास आहे.

- आ.सिद्धार्थ शिरोळे, उमेदवार भाजप शिवाजीनगर

# 'खडकवासला' विजयाचा! भाजपचा शंखनाद

- मोठ्या शक्ती प्रदर्शनाने आ. तापकीर यांचा उमेदवारी अर्ज दाखल




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
भारतीय जनता पार्टी-महायुतीचे खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार विद्यमान आमदार भीमराव तापकीर यांनी रॅली द्वारे शक्ती प्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आयोजित केलेल्या नामांकन रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यामुळे खडकवासला मतदारसंघातील वातावरण कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले आहे. खडकवासल्यामध्ये विजय मिळणार हा आत्मविश्वास घेऊन भाजपाचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत.

या रॅलीसाठी केंद्रीय मंत्री मा.श्री. मुरलीधरजी मोहोळ, माजी खासदार श्री. प्रदीपदादा रावत, प्रदेश महामंत्री श्री. रघुनाथ कुलकर्णी, श्री. राजेश पांडे , विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष सचिन मोरे, पश्चिमचे अध्यक्ष गणेश वरपे, ग्रामीणचे अध्यक्ष नवनाथ तागुंदे, खडकवासला राष्ट्रवादीचे अध्यक्ष बाबा धुमाळ, तसेच

शहर भाजपचे पदाधिकारी, मा. नगरसेवक, कार्यकर्ते आणि मतदार प्रचंड मोठ्या बहुसंख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार तापकीर यांनी सिंहगड कॉलेज येथे उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यानंतर माध्यमाशी त्यांनी संवाद साधला. यावेळी विजयाचा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

## विकास हाच माझा विजय : आ. तापकीर

मतदार संघातील सर्व मतदार व पक्षश्रेष्ठींचे मनपूर्वक आभार मानतो की मला चौथ्यांदा ही संधी दिली आहे. खडकवासला मतदार संघातील विकास कामे, व मतदारांची असलेली साथ या बळावर चौथ्यांदा विधानसभेत जाणार हा आत्मविश्वास नक्की आहे. मतदारसंघातील ट्रॅफिकची समस्याही ही लवकरच सुटणार आहे.मेट्रोचे काम लवकर सुरू होणार आहे. मागील अनेक वर्षापासून ग्रामीण असो वा शहरी दोन्ही भागात विकासाचे ध्येय साकारण्याचा प्रयत्न करत आहे.त्याला यशही मिळाले आहे. ही निवडणूक नक्की वेगळी आहे परंतु माझा विजय फिक्स आहे.माझे सहकारी व महायुतीचे सर्व पदाधिकारी एकत्रित रित्या खडकवासल्याच्या विजयासाठी प्रयत्न करणार आहेत.

- आ. भीमराव तापकीर, उमेदवार भाजप, खडकवासला

# महाविकास आघाडीकडून सचिन दोडके यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## शक्ती प्रदर्शन न करता उमेदवारी; साधेपणाची सर्वत्र चर्चा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
खडकवासला विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडीच्या (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष) वतीनं माजी नगरसेवक सचिन शिवाजी दोडके यांनी काल सिंहगड कॉलेज येथे उमेदवारी अर्ज दाखल केला.

त्यांच्यासोबत पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. कोणतीही रॅली व गाजवाजा , शक्तिप्रदर्शन न करता दोडके यांनी उमेदवारी सादर केली.

उमेदवारी अर्ज भरताना शक्तिप्रदर्शन व रॅली करून आपली ताकद दर्शविण्याचा उमेदवार प्रयत्न करत असतात. मात्र दोडके यांनी जपलेल्या साधेपणाची चांगलीच चर्चा होत आहे.

मागील विधानसभा निवडणुकीमध्ये खडकवासला मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसने दोडकेना उमेदवारी दिली होती त्यावेळी त्यांनी भाजपाच्या आ.तापकीर यांना तगडी फाईट दिली होती.

केवळ अडीच हजार मतांनी त्यांचा पराभव झाला होता.

इच्छुकांची स्पर्धा असतानाही यावेळेसही पक्षाने त्यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास दर्शवला आहे.

या वेळेस त्यांच्यासमोर आ. तापकीर, मनसेचे मयुरेश रमेश वांजळे असे मोठे आव्हान आहे. याचा ते कसा सामना करतात याकडे सर्वांचे लक्ष आहे.

## मतदारांचा प्रतिसाद हीच विजयाची नांदी : दोडके

मतदारसंघातील ज्येष्ठ नागरिक, महिला भगिनीं, बाजार पेठेतील व्यापारी, विविध समाजातील समाजबांधव यांचा आपल्याला पाठिंबा मिळत आहे. विशेष म्हणजे तरुण सहकारी वर्गाचा देखील प्रचंड प्रतिसाद कायमच सोबत असून आहे. गेल्या अनेक वर्षात आपण मला दिलेले प्रेम आणि आशिर्वाद असेच पाठिशी राहू द्या. यंदा आपल्या सर्वांच्या सोबतीनं आपल्या खडकवासल्याच्या निष्ठेचा आणि स्वाभिमानाचा लढा आपल्याला जिंकायचा आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.